# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र. क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५
**दूरध्वनी :** ०२२-२२१६ ३९६४ /६५/६९ , **फॅक्स :** २२१६३९७६
**ई-मेल :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेत-स्थळ :** www.mercindia.org.in/www.merc.gov.in

जाहीरात क्र. १५/२०१८-१९

## जाहीर सुचना

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सुरु केलेल्या मे. ग्लोबल एनर्जी प्रा. लि.च्या चौकशी प्रकरणी अभिप्राय/निवेदने मागविण्याबाबत**

१. मा. आयोगाने, सन २०१८ च्या प्रकरण क्र. २४२ मध्ये दि. १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी दिलेल्या आपल्या आदेशात, विजेच्या व्यापाराचा राज्यांतर्गत व्यापार परवानाधारक असलेली मे. ग्लोबल एनर्जी प्रा. लि. (जीइपीएल) विद्युत अधिनियम, २००३ किंवा त्याखाली तयार करण्यात आलेले नियम आणि विनियम आणि त्यांच्या व्यापार परवान्याच्या अटी आणि शर्ती द्वारा सोपविण्यात आलेली कोणतीही कर्तव्ये आणि बंधने पार पाडण्यात कसुर करीत आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

२. मा. आयोगाने दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ च्या अधिसूचनेन्वये, दि. १५ ऑक्टोबर, २०१८ च्या आदेशातील परिच्छेद क्र. २३ आणि २४ मध्ये अभिप्रेत असल्यानुसार जीइपीएलची चौकशी करण्यासाठी डॉ. सुधीर कुमार गोयल (निवृत्त भाप्रसे, महाराष्ट्र शासन) यांचा समावेश असलेली एक सदस्यीय चौकशी समिती गठीत केली आहे. सदर अधिसूचनेमध्ये चौकशीची व्याप्ती विनिर्दिष्टकरण्यात आली आहे. आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेत-स्थळावर मा. आयोगाने सन २०१८ च्या प्रकरण क्र. २४२ मध्ये दि. १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी पारित केलेला आदेश आणि अधिसूचनेची प्रत उपलब्ध आहे.

३. सदर अत्रसूचनेन्वये, चौकशी समिती विद्यमान चौकशीच्या व्याप्तीच्या संदर्भात सर्व जनतेला निवेदन देण्याची संधी देत आहे. या संबंधात चौकशी समिती याद्वारे लिखित अभिप्राय/हरकती मागवित असून त्या चौकशी समितीचे सचिव [संचालक (विद्युत अभियांत्रिकी)] यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५, येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्सः०२२-२२१६३९७६, ई-मेलः mercindia@merc.gov.in) द्वारा कृपया पाठविण्यात याव्यात. दिनांक ८ डिसेंबर, २०१८ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होणारे सर्व अभिप्राय/हरकती समितीकडून चौकशी दरम्यान विचारात घेण्यात येतील.

**दिनांक : दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१८**
**ठिकाण : मुंबई**

**(सचिव, चौकशी समिती)**

Shalini

Size 8 (W) x 10 (H) cm